**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०९ ची साक्ष**

**निशाणी क्र. ७६**

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| नाव | – | अमृत दगा बागले, |
| वय | – | ६५ वर्षे, |
| व्यवसाय | – | काही नाही, |
| राहणार | – | मालपुर, ता. शिंदखेडा, जि. धुळे, |

**सरतपास शपथेवर अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. जे. एस. गंगावणे यांचे मार्फत.**

०१. राजश्री पानपाटील हया मालपुर गावाच्या सरपंच होत्या. घटना दि. २४.१६.२००५ रोजीची आहे. त्यादिवशी आम्ही चार ते पाच जण सरपंचांच्या घरी बसलो होतो. आम्ही लोटन इंदवे, राजु इंदवे, संतोष कोळी आणि मी असे लोक होतो. त्यावेळी आम्ही चहा पाणी पित गप्पा मारत होतो. त्यावेळेस संतोष निंबा इंदवे हा आला व राजश्री यांच्याकडे पन्नास हजार रुपये मागितले. पन्नास हजार रुपये कशासाठी मागितले हे मला सांगता येणार नाही. त्यानंतर तो संतापाने बघुन घेईन असे म्हणुन निघुन गेला. त्यानंतर आम्ही उठुन निघुन गेलो.

**सरतपास पुर्ण.**

**शपथेवर उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एन. पी. अयाचीत यांचे मार्फत.**

०२. मला आज रोजी न्यायालयात येण्याबाबत समन्स मिळाले होते. २०१६ मध्ये मी गल्लीमध्ये येवुन जावुन करीत होतो. कोणाच्या तरी शेतावर वगैरे जात होतो. मी मजुरी करीत होतो. हे म्हणणे खरे नाही की, लक्ष्मण गंभीर पानपाटील हे माझे नातेवाईक आहेत. हे म्हणणे खरे आहे की, राजश्री व लक्ष्मण हे माझ्या समाजाचे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझे व लक्ष्मण यांचे चांगले संबंध आहेत. संतोष राजश्री हिच्याकडे पन्नास हजार रुपये मागत असल्याबाबत मी तक्रार केलेली नव्हती. तसेच, लोटन, राजु किंवा संतोष यांच्यापैकी देखील

कुणीही तक्रार केली नाही. पोलीसांनी माझ्याकडे चौकशी केली नव्हती. मी पोलीस स्टेशन येथे जावुन जबाब दिला नव्हता.

०३. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात कथन केल्याप्रमाणे कोणतीही घटना माझ्यासमक्ष नमुद दिवशी घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सुरत येथे राहतो. हे म्हणणे खरे नाही की, मी लक्ष्मण गंभीर पानपाटील याच्या सांगण्यावरुन आज रोजी न्यायालयात आलेलो असुन मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

ADITYA GHANSHAM NAIK

Digitally signed by ADITYA GHANSHAM NAIK
Date: 2025.12.15 11:02:14 +0530

दिनांक : १२/१२/२०२५ (आदित्य घ. नाईक)
स्थळ : दोंडाईचा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, दोंडाईचा

## प्रमाणपत्र

मी प्रमाणित करितो की, सदर पी.डी.एफ. संचिकेतील मजकूर हा स्वाक्षरीत करण्यात आलेल्या मूळ न्यायनिर्णय/ आदेशाप्रमाणे खरा व बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | - | गणेश साईनाथ अहिरे, |
| न्यायालयाचे नांव | - | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दोंडाईचा |
| पीडीएफ फाईल अपलोड केल्याचा दिनांक. | - | १५.१२.२०२५ |

स्वाक्षरित/-

लघुलेखक (श्रेणी-३)